तळेगाव दाभाडे नगरपरिषद
जि. पुणे.

विशेष सभा /सर्वसाधारण सभा
दिनांक - २१/६/२००८
विषय क्रमांक | १८ |

नगरपरिषद सभा / कौन्सिल सभा. समिति

---

**सदर विषयांवर आमचा खालीलप्रमाणे प्रस्ताव / सुधारणा आहे.**

श्री कृष्णराव भेगडे विद्यालयाने मनोहरनगर येथील मंजूर रेखांकनामधील खुली जागा शैक्षणिक कार्याकरिता मिळावा अशी मागणी केलेली आहे. सदरचा भूखंड नगरपरिषदेस हस्तांतरित करण्यात येऊन त्यानंतर कृष्णराव भेगडे विद्यालय या संस्थेस शैक्षणिक कार्याकरिता सदरचा भूखंड देणेस कार्यावाही करणेस ही सभा वित्तीय व प्रशासकीय मान्यता देत आहे. यासाठी आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी.

(मा. उमाकांत ए. कुलकर्णी )
सूचक

(मा. दिलीप ह. खळदे)
अनुमोदक

---

प्रस्तावास / सुधारणेस पडलेल्या मताचा तपशील
उपस्थि सदस्य २३ पैकी नामनिर्देशित सदस्य २ अनुकुल २१ विरुध्द तटस्थ
अध्यक्ष / सभापती श्रीमती मिरा द. फल्ले समिती

नगरपरिषद ठराव क्र मांक

मुख्याधिकारी

खरी नक्कल
चीफ ऑफिसर
तळेगांव दाभाडे नगर परिषद

# तळेगांव दाभाडे नगरपरिषद,

जि. पुणे - ४१० ५०६.
( उपविधा क्र. १३.१ )

## भोगवटा प्रमाणपत्र
(OCCUANCY CERTIFICATE)

तळेगांव दाभाडे नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे क्र. ८ नवा

सि. स. नं. - म्यु. पल घर नं.

पेठ/नगर/कॉलनी मनोहरनगर भुखंड क्रमांक मोकळी जागा (०.S.) वरील

इमारतीचे बांधकाम / उभारणी / पुर्नउभारणी / फेरबदल करण्यासाठी कार्यालयीन आदेश क्र. नविन / बाप

दिनांक अन्वये

श्री./ श्रीमती मेसर्स चेअरमन . मनोहर नगर रेसिडेन्सी (तळेगाव विद्या प्रतिष्ठान)

यांना परवानगी देण्यात आली होती.

वरील परवानगी प्रमाणे अर्जदार यांनी सर्व भाग / इमारतीचे बांधकाम / उभारणी / पुर्नउभारणी / फेरबदल

श्री. / श्रीमती / मेसर्स सचिन के टकले

लायसेन्स नंबर ३८५ / २००५

लाइसेन्सड अर्किटेक्ट / इंजिनीअर / सुपरवायझर यांच्या देखरेखीखाली पूर्ण केले असल्याने खाली नमुद केलेल्या इमारतीचा भोगवटा करणेस महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ च्या कलम १९३ अन्वये परवानगी देण्यात येत आहे.

### इमारतीचे वर्णन

| स.क्र. | भुखंड क्रमांक | रस्ता | खोल्याची संख्या | वर्णन |
|---|---|---|---|---|
| ८ नवा | मोकळी जागा<br>Club House | कॉलनी रस्ता | तळमजला | तीन = जिम्नॅशियम रूम<br>एक = ऑफीस<br>प्र. एक = W.C / Bath |

एकूण अंदाजे बिल्टप क्षेत्रपळ चौ.मी.

हा दाखला आज दिनांक 22 APR 2008 रोजी माझ्या सहिने कार्यालयीन शिक्यानिशी दिला आहे.


मुख्याधिकारी
तळेगांव दाभाडे नगरपरिषद

जा.क्र. ननि / भोप्रप्र / १०२३/०८
तळेगांव दाभाडे नगरपरिषद
नगर नियोजन व विकास विभाग
ता. मावळ, जि. पुणे.
दिनांक : 22 APR 2008
प्रति,


१) श्री / श्रीमती चेअरमन. मनोहरनगर रेसिडेन्सी.

२. कर निरीक्षक
तळेगांव दाभाडे नगर परीषद.


नंदकुमार सोपान कोतुळकर
विशेष कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र शासन
७४५, सोमवार पेठ, तळेगांव दाभाडे,
ता मावळ, जि. पुणे.




## FRONT ELEVATION
SCALE - 1:100



## SECTION AA
SCALE - 1:100



## LOCATION PLAN
NOT TO SCALE



## AREA KEY PLAN
SCALE - 1:400

## AREA CALCULATION

AREA UNDER B/UP BLOCK ABCD (GF)
BLOCK ABCD -- 25.85X08.95m -- 231.35 SQMT


PROPOSED GF B/UP AREA ---- 231.35 SQ MT

## SCHEDULE OF OPENINGS


| DOORS | WINDOWS |
|---|---|
| D - 1.50 X 2.10m | W - 2.10 X 1.20m |
| D1 - 0.90 X 2.10m | W1 - 1.50 X 1.20m |
| D2 - 0.75 X 2.10m | V - 0.60 X 0.75m |

## LEGENDS

PLOT BOUNDARY IS SHOWN IN -BLACK
PROPOSED WORK IS SHOWN IN -RED
DRAINAGE LINE IS SHOWN IN --RED DOTTED
WATER LINE IS SHOWN IN --BLACK DOTTED




## GROUND FLOOR PLAN
SCALE - 1:100




## SITE PLAN
SCALE - 1:400

NOTE - DO NOT SACLE THE DRG WRITTEN DIM FOLLOWED ONLY

stamps of approval

LEGENDS

PLOT BOUNDARY IS SHOWN IN -BLACK
PROPOSED WORK IS SHOWN IN -RED
DRAINAGE LINE IS SHOWN IN --RED DOTTED
WATER LINE IS SHOWN IN --BLACK DOTTED

| area statement | sq mt |
|---|---|
| AREA OF THE PLOT (OPEN SPACE) | 2325.00 |
| ALLOWABLE B/UP AREA (10 | 0232.50 |
| PROPOSED B/UP AREA | 0231.35 |

project "REVISED"

PROPOSED "SAMAJ MANDIR" DESIGN ON OPEN SPACE - "B", AT MANOHAR NAGAR, S. NO. 8 (NEW), TALEAGON DABHADE, DISTRICT - PUNE. FOR :- MANOHAR NAGAR RESIDENCY FOUNDATION

owner

For
CHAIRMAN
MANOHAR NAGAR RESIDENCY FOUNDATION

consulting engineer

SACHIN K. TAKALE
ARCHITECTURAL & RCC CONSULTANT
SHOP.NO. 5, "INDRAPRASTHA"
P. NO. 3/4, MANOHAR NAGAR
TALEGAON DABHADE (STN)
REGD NO. 385 / 2005 (TDMC).

SACHIN TAKALE STRUCTURAL ENGINEER Regd. No. 385/05 TALEGAON STATION

| DRN :- SHREE | CHD :- SACHIN | DATE :- 19-09-2005 |
|---|---|---|

# तळेगांव दाभाडे नगरपरिषद

ता. मावळ, जि. पुणे

# बांधकाम चालू करण्याकरिता दाखला

## कमेन्समेन्ट सर्टिफिकेट

(सदरहू बांधकामम चालू करण्याचा दाखला म.प्रा.व.न.र. अधिनियम १९६६ च्या कलम ४५ अन्वये खालील अटीनुसार देण्यात आहे.) (जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्काचे संदर्भ न घेता अर्जदारास हे संमती पत्र देण्यात येत आहे.

जा. क्र. : ननि/बाप/कावि/१/

तळेगांव दाभाडे नरपरिषद

नगरनियोजन व विकास विभाग

ता. मावळ, जि. पुणे - ४१० ५०६

दिनांक : / / २००

प्रति,

श्री/श्रीमती/मे. चेअरमन मनोहर नगर रेसिडन्सी (तळेगाव विद्या प्रतिष्ठान)

व्दारा ला.सु.श्री

राहणार मनोहर नगर, तळेगांव-स्टेशन.

महोदय / महोदया,

आपण दिनांक ३१/३/०६ रोजी पाठविलेला तळेगांव दाभाडे नगरपरिषद हद्दीतील सि.स.क्र. — स.क्र. ८नवा भूखंड क्र. open space वर नविन बांधकाम / उभारणी / फेरबदल या संबंधीचा अर्ज मिळाला. सदर बाबतीत आवश्यक तपासणी व चौकशी केल्यानंतर खालील अटी व शर्तींना आधीन राहून बांधकाम सुरु करण्यास तुम्हास संमती पत्र देण्यात येत आहे

१) सोबत मंजुर केलेल्या ( लाल ) रंगात दुरुस्ती केल्याप्रमाणे) नकाशाप्रमाणे बांधकाम केले पाहिजे कोणत्याही प्रकारच्या अटी व शर्तीचे भंग केल्याचे किंवा पालन न केल्याचे किंवा अर्जात धुजीची माहिती दिल्याचे आढळल्यास सदरहु परवाना रद्द करण्यात येईल.

२) प्रश्नाधीन भूखंड बिगरशेती कारणासाठी वापरणेस संबंधीत महसूल अधिकारी यांची लेखी संमती घेऊन नगरपरिषदेस सादर करावी. तसेच नागरी जमिन परामर्यादा अधिनियमाखाली आवश्यक परवानगी सक्षम प्राधिकारी यांचेकडून घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय बांधकाम सुरु करु नये. नविन बांधकामासाठी झाडे तोडणे आवश्यक असल्यास त्यासाठी ट्री ॲथोरिटीकडून परवानगी घेणे आवश्यक आहे. यु.एल.सी च्या कोणत्याही बाबी बाबत न.प. जबाबदार नाही. यांची नोद कृपया घ्यावी.

३) संबंधीत भूखंडावर तालुका निरीक्षक भूमि अभिलेख/सिटी सर्व्हे ऑफिस करवीप्रत्यक्ष जागेवर सिमांकन करुन घ्यावे.

४) पाया खोदाई सुरु करण्यापुर्वी म्यु. आवेक्षक यांचेकडून लाईन आऊट तपासून घेणे व नंतर प्रत्यक्ष काम सुरु करावे.

५) सदर भूखंडालगत/जवळुन/वरुन कोणत्याही प्रकारची विद्युत वाहिनी जात असल्यास त्या बाबत एम.एस.ई.बी. अग सक्षम अधिकारी यांचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन ते. न.प.स. सादर करावे त्या शिवाय प्रत्यक्ष कामास सुरुवात करु नये.

६) प्लिथ चेकिंगचा दाखला घेतल्याशिवाय पुढील काम करु नये. (प्लिथ च;किंगचा दाखला घेतेवेळी स्ट्रक्चरल इंजिनिअरचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

७) इमारतीतील सांडपाणी / पावसाचे पाणी यांची निर्गत आणि घरातील नळ फिटींग काम नगरपरिषदेकडे नोंदणी कृत प्लंबरकडून इकडील सूचनेप्रमाणे करुन घेणेच आहे, सेप्टीक टँकचे साईज स्टँडर्डप्रमाणे असावेत.

८) इमारत आवारात (भुखंडाच्या १०० चौ. मी. क्षेत्रास एक या प्रमाणे किंवा) किमान दोन झाडे लावून त्याची जोपासना आवश्यक आहे.

९) ग्रुप हाऊसिंग योजना असल्यास प्रत्येक टेनामेंट मागे कमीत कमी दोन झाडे लावून त्याची जोपासना आवश्यक आहे.

१०) प्रस्तुत परवानजी प्रमाणे इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेल्या तारखेपासुन एक महिन्याचे आत कॅम्प्लीशन सर्टिफिकेट करिता संबंधित पर्यवेक्षकांच्या प्रमाणपत्रासह लेखी अर्ज देऊन व इकडील लेखी परवानगी घेऊन मगच इमारत भोगवट्यास घेणेची आहे.

११) सदरहु बांधकाम संमती पत्राची मुदत एक वर्ष राहील आणि त्या नंतर वाढवून घेतली नसल्यास आपोआप रद्द झाले असे समजण्यात येईल.

१२) जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कासंबधी तरीच चर्तुसिमें संदर्भाच्या कोणत्याही तक्रारीस नगरपालिकी जबाबदार नाही याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

१३) बांधकाम करताना दुसऱ्याच्या जागेत अतिक्रमण होणार नाही व दुसुयाच्या कायदेशीर हक्कास बाधा येणार नाही यांची दक्षता घेतली पाहिजे.

१४) इमारतीकरीता जे बांधकाम साहित्य आणले जाईल त्याची जकात ज्यात्या वेळी आवश्यकतेवर भरणेची आहे आणि मागितल्यावर सर्वल हिशोब दाखविणे बंधनकारक आहे.

१५) इमारतीचे साहीत्य जर नगरपरिषद रस्त्यावर अगर अडथळा न येता ठेवण्याचे झाल्यास त्यासाठी दर चौ. फुटशस दररोज रु. १/- याप्रमाणे भाडे आकारले जाईल. बांधकाम सुरु करण्यापुर्वी नगरपरिषदेची जागा वापरणार अगर कसे याबद्दल अर्ज देऊन त्या सोबत होणारे हशील भरुन मगच बांधकाम सुरु करणेचे आहे.

१६) संबंधीत भुखंडा बाबत रस्ता, विज, पाणी, ड्रेनेज इ. कामे म्युनिसिपल स्पेसिफिकेशन प्रमेणेच नोंदणीकृत एजन्सीकडून तयार केल्या पाहिजे अन्यथा सदर डेव्हलमेंट बाबतच्या तक्रारी आल्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही.

१७) हा दाखला नगरपरिषद मुख्यधिकारी किंवा त्यांनी प्रतिकृत केलेले अधिकारी अथवा समक्ष पोलिस अधिकारी यांनी पाहण्यास मागितला असता दाखविला पाहिजे. अन्यथा संमती पत्राविना बांधकाम चालू आहे, असे समजण्यात येईल. तसेच कामासंबंधी काही सूचना दिल्यास ते पालन करण्याचे आपलेवर बंधनकारक राहील.

१८) म. प्रा. व. न. र. अधि. (सु.) १९९२ प्रमाणे न. प. ने संमत केलेल्या ठरावानुसार विकास शुल्क भरावे. अन्यथा १८% प्रमाणे व्याज भरावे लागेल.

१९) अर्जदाराने सादर केलेली माहिती/कागदपत्रे खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्यास देणेत आलेली बांधकाम परवानगी रद्द समजणेस येईल.

२०) प्लांथचेकींग/भोगवटा प्रमाणपत्राचे वेळी विहीत नमून्यात स्ट्रक्चरल इंजिनिअरचे प्रमाणपत्र सादर करणे आपणावर बंधनकारक राहील.

२१) इमारतीचे आवारात सुयोग्य आकाराची कचराकुंडी व इमारती भोवती पुरेशा प्रमाणात ट्युब लाईट बसविले आपणावर बंधनकारक आहे.

२२) सिन्टेक्सची पाण्याची टाकी असल्यास जस्ताचे झाकन बसविणे आवश्यक आहे.

२३) ओला व सुका कचरा साठविण्यासाठी इमारतीसमोर स्वतंत्र व्यवस्था केल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देता येणार नाही.

२४) सदरहू इमारतीचे स्ट्रक्चरल डिझाईनमध्ये भूकंप प्रतिरोधक उपाय योजना करणे आपणांवर बंधनकारक राहील.

२५) कुमुधा पत्रकामध्ये नंतर काही बदल झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणांवर राहील.

२६) यापूर्वी न. प. त. दा. ने पत्र जा. क्र. नानि/बापु/कावि/९/..........दि..........अन्वये दिलेली बांधकाम परवानगी रद्द समजणेत येईल.

२७) दिशाभूल करणारी कागदपत्रे दिल्यास अगर सादर केल्यास सदरची परवानगी तात्काळ रद्द करण्यात येईल.

वरील संमतीप्रमाणे काम करताना नगररचना अधिनियम अगर त्यास अनुसरुन केलेले नियम व पोटनियम यांचा भंग होता कामा नये. वरील संमती पत्रासंबंधी काही शंका येत असेल तर आरंभ करण्यापूर्वी नगरपरिषदेकडे तसे कळवून स्पष्टीकरण करून घ्यावे.

मुख्याधिकारी
तळेगांव दाभाडे नगरपरिषद